<u>जिल्हा परिषदेच्या शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांसाठी सुधारित धोरण.</u>

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन शुद्धीपत्रक क्रमांक :- जिपब- ४८१७/प्र.क्र.७/आस्था-१४**

२५- मर्झबान पथ, बांधकाम भवन, फोर्ट,
मंबई-४०० ००१,
दिनांक : १५ एप्रिल, २०१७

**<u>वाचा -</u>**

१) शासन निर्णय क्रमांक जिपब-४८१७/प्र.क्र.०७/आस्था-१४, दिनांक २७/२/२०१७

**शुद्धीपत्रक-**

उपरोक्त शासन निर्णयातील भाग १ मधील अ. क्र. ५ मधील शिक्षक या संवर्गाच्या व्याख्येमधून माध्यमिक शिक्षक व केंद्रप्रमुख यांना वगळण्यात येत असून त्यांना यापुर्वीचा शासन निर्णय क्र. जिपब ४१४/ प्र. क्र. ११२/ आस्था १४ दि. १५/५/२०१४, शुद्धीपत्रक क्र. जिपब४१४/ प्र.क्र. ११२ /आस्था १४ दि. २ /७/२०१४ तसेच शुद्धीपत्रक क्र. जिपब ४८१६/ प्र. क्र. १३६/ आस्था १४ दि. २ जानेवारी २०१७ मधील तरतुदी लागू राहतील.

संदर्भाधीन शासन निर्णयामधील भाग । व्याख्या मधील अ. क्र. ८ मध्ये विशेष संवर्ग शिक्षक भाग १ मध्ये (औ) वयाची ५३ वर्ष पूर्ण केलेले कर्मचारी यानंतर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे.

अं.) मेंदूचा आजार झालेले कर्मचारी
अ:) मणक्याचा विकार असलेले कर्मचारी
क) स्वातंत्र्य सैनिकाचा मुलगा/मुलगी/ नातू /नात (स्वांतंत्र्य सैनिक हयात असेपर्यंत)
ख) थॅलेसेमिया विकारग्रस्त मुलांचे पालक

तसेच संदर्भाधीन शासन निर्णयामधील V) इतर धोरणात्मक बाबी या भागामध्ये पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे.

६) बदलीसंबधाने कोणत्याही प्रकारची अनियमितता होऊ नये याबाबत विभागीय आयुक्त यांनी दक्षता घ्यावी. विहित केलेल्या पद्धतीनुसार बदल्या करणे आवश्यक आहे. अन्यथा कसूर करणारा अधिकारी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहील. बदल्याबाबतच्या अनियमिततेबाबतची तक्रार प्राप्त

झाल्यास त्यानुषंगाने अनियमितता दूर करण्याबाबत प्रकरणपरत्वे चौकशी करून त्यावर विभागीय आयुक्त यांनी ३० दिवसात निर्णय घ्यावा व तो निर्णय अंतिम राहील.

सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७०४१५१०५७१५५६२० असा आहे. हे शुद्धीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Aseem Gupta

Digitally signed by Aseem Gupta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42cb1d992ceadc1f5fea3c14e1cedf9b5ea392a9c81fdbde5629e68c9158678b, cn=Aseem Gupta
Date: 2017.04.15 16:00:11 +05'30'

**( असीम गुप्ता )**
**सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव,मलबार हिल, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३) मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री ग्रामविकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
४) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५) सर्व सन्माननीय विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय , मुंबई
६) मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व अपरमुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव,सर्व मंत्रालयीन विभाग
८) सर्व विभागीय आयुक्त
९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०) उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व विभाग)
११) माहिती व जनसंपर्क संचालनालय यांना प्रसिध्दीसाठी अग्रेषित.
१२) सर्व कार्यासने, ग्रामविकास विभाग
१३) निवड नस्ती कार्या क्र.आस्था-१४, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.